ISBN - 978-93-91305-33-8

# संत साहित्य, कार्य : चर्चा व चिंतन



संपादक
प्रा. डॉ. पंकज शं. वानखेडे

Scanned with CamScanner

ISBN-978-93-91305-33-8

# संत साहित्य,
# कार्य : चर्चा व चिंतन

**संपादक**
**प्रा. डॉ. पंकज शं. वानखेडे**
मराठी विभाग प्रमुख
नरसम्मा परिसर,कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
किरण नगर,अमरावती.

आधार पब्लिकेशन्स, अमरावती

Scanned with CamScanner

ISBN-978-93-91305-33-8

# अनुक्रमणिका



| अ. क्र. | लेख | लेखक | पु.क्र. |
|---|---|---|---|
| 1 | संत मीराँबाई | डॉ.प्रमोद परदेशी | 1 |
| 2 | श्रीचक्रधर स्वामींचा स्त्रीवादी विचार | प्रा. डॉ. किरण प्रभाकर वाघमारे | 7 |
| 3 | संत मुक्ताबाईची अभंगवाणी | डॉ. प्रवीण घारपुरे | 12 |
| 4 | संत नामदेवांच्या अभंगातील सामाजिक विचार | प्रा. डॉ. डिगोळे बालाजी विठ्ठलराव | 22 |
| 5 | संत नामदेव यांच्या अभंगातील कृष्णभक्ती | डॉ. अण्णा प्र. वैद्य | 29 |
| 6 | भक्ती तत्वज्ञानाचा वारकरी - संत सावता माळी | प्रा. महेंद्र खुशालगीर गिरी | 39 |
| 7 | संत चोखामेळाच्या अभंगातील भक्तिभाव | डॉ.श्याम मु.जाधव | 45 |
| 8 | विठ्ठलाचा चोख उपासक संत चोखामेळा | प्रा.डॉ.एकनाथ वैजनाथ भिंगोले | 49 |
| 9 | संत साहित्यातील संत चोखामेळा यांचे ''समतावादी विचार" | प्रा.डॉ. मंदाकिनी मेश्राम | 56 |
| 10 | संत चोखामेळा यांच्या अभंगांतील आर्थिक विचाराचे स्वरूप | प्रा.डॉ.गणेश शिवाजी मारेवाड | 60 |
| 11 | समर्थ रामदासांचे कार्य व कर्तृत्व : एक संक्षिप्त आढावा(सामाजिक, राजकीय, धार्मिक, वांङ्मयीन असा सर्वांगीण दृष्ट्या विचार) | प्रा. डॉ. चंद्रशेखर सुधाकर देवघरे | 66 |



Scanned with CamScanner

ISBN-978-93-91305-33-8


| | | |
|---|---|---|
| 12 | संत तुकाराम महाराजांचे समाज प्रबोधनात्मक विचारप्रा. सुपारे यु.पी. | 73 |
| 13 | थोर समाजसुधारक : संतकवी तुकाराम प्रा. छत्रपाल श्रीपतराव लांबकाने | 81 |
| 14 | संत तुकारामांचे सामाजिक विचार प्रा.डॉ.शिल्पा दिपक काकडे | 87 |
| 15 | संत तुकाराम महाराज यांचे सांस्कृतिक व समाज प्रबोधनात्मक विचार प्रा. प्रफुल ई. ढोके | 91 |
| 16 | तुकाराम महाराज यांचें सामाजिक विचार प्रा.डॉ. मिलिंद भिवाजी कांबळे | 98 |
| 17 | तुकाराम महाराज आणि त्यांचे चौदा टाळकरी डॉ. न. ह. खोडे | 102 |
| 18 | संत तुकाराम यांचे विद्रोही विचार प्रा.डॉ. वंदना भोयर | 110 |
| 19 | संत बहिणाबाईच्या काव्यातील विद्रोह (विशेष संदर्भ—आत्मचरित्र व वज्रसूची) डॉ. एकनाथ श्रीपती फुटाणे | 114 |
| 20 | संत गाडगेबाबांचे दशकलमी तत्त्वज्ञान प्रा.डॉ.गजानन एस. फुटाणे | 126 |
| 21 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे सामाजिक विचार प्रा. विजय डी. वाकोडे | 132 |
| 22 | भजनातून क्रांती घडविणारा संत : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज प्रा. डॉ.विजय राऊत | 137 |
| 23 | आधुनिक संत - राष्ट्रसंत श्री. तुकडोजी महाराज प्रा. डॉ. प्रमोद दामोदर देवके | 144 |
| 24 | ग्रामगीतेतील राष्ट्रसंतांचे कृषि विषयक विचार अभिनव गजानन फुटाणे | 149 |


Scanned with CamScanner

ISBN-978-93-91305-33-8



| | | |
|---|---|---|
| 25 | राष्ट्रसंताची प्रवचणे : सामाजिक मुल्य<br>**डॉ. प्रवीण कारंजकर** | 155 |
| 26 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या समाजप्रबोधनातील वैज्ञानिक दृष्टिकोण **डॉ. नरेंद्र ईश्वर घरत** | 162 |
| 27 | संतविचार आणि अंधश्रद्धा निर्मूलन<br>**प्रा.नारायण बा.पाटील** | 170 |
| 28 | कर्म हीच पुजा **डॉ. माधुरी भटकर** | 177 |



Scanned with CamScanner

ISBN-978-93-91305-33-8

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या समाजप्रबोधनातील वैज्ञानिक दृष्टिकोण

**डॉ. नरेंद्र ईश्वर घरत**
मराठी विभाग प्रमुख श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर

---

**प्रास्ताविक :—**

महाराष्ट्रात अनेकात एकत्व पाहणारे संतमहात्मे गेल्या दोन हजार वर्षात जन्माला आले. त्यांनी साहित्यातून समाजाला देशकाल परिस्थितीप्रमाणे प्रबोधन केले. त्या प्रबोधनामुळेच नैतिक मूल्यांचे संवर्धन झाले. जीवनमूल्यांना स्थिरता आली. मराठी साहित्यपरंपरा संत ज्ञानेश्वरांपासून सुरू होऊन आता विसाव्या शतकातील राष्ट्रसंत तुकडोजींपर्यंत येऊन पोहचलेली आहे.

गेल्या एकोणिसाव्या शतकापर्यंत संतांचे साहित्य संत तुकारामांचा अपवाद वगळता विशेषत: भक्ती, कर्म आणि ज्ञान यांच्या भोवतीच फिरत होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी भक्ती, कर्म आणि ज्ञान हे तत्त्वज्ञान तर प्रत्यक्ष समाजजीवनात उतरविले, त्याच सोबत त्यांनी सामाजिक जाणीव ठेवून, सांस्कृतिक मूल्यांची जपवणूक करून राष्ट्रीय व वैश्विक विचारांना व आचारांना प्रोत्साहन दिले. स्वत: जगा आणि इतरांनाही जगू द्या. अव्दैतभाव सदैव जागृत ठेऊन माणुसकी धर्माचे प्रबोधन केले. प्रत्यक्ष विविध चळवळीच्या माध्यमातून हे प्रबोधन वरपांगी नव्हते तर या प्रबोधनाला वैज्ञानिक दृष्टिकोणाचा आधार होता.

प्रस्तुत शोधनिबंधातून राष्ट्रसंत तुकडोजींनी चळवळीच्या माध्यमातून केलेले समाजप्रबोधन आणि त्यांच्या साहित्यातील वैज्ञानिक दृष्टिकोण यांचे दर्शन संक्षिप्तपणे घडविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी समाजप्रबोधनाच्या माध्यमातून कोणकोणत्या कार्यक्षेत्राचा अंतर्भाव केला याचाही परामर्श घेतलेला आहे.

**राष्ट्रसंतांच्या समाजप्रबोधनातील वैज्ञानिक दृष्टिकोणाचे स्वरूप :—**

अनिष्ट रूढी, परंपरा, अंधविश्वास, अंधश्रद्धा यांना बळी न पडता पूर्वग्रहरहित विचारसरणी आणि पुराव्याच्या मदतीने काढलेल्या अनुमानावर व सत्याच्या कसोटीवर सिद्ध करणारा दृष्टिकोण म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोण होय. तसेच आपल्या सभोवार घडणाऱ्या गोष्टींचा कार्यकारणभाव तर्कसंगत बुद्धीने मांडणे आणि त्याप्रमाणे कृती करणे



Scanned with CamScanner

ISBN-978-93-91305-33-8

म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोण स्वीकारणे होय. वैज्ञानिक दृष्टिकोण स्वीकारल्यामुळे अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी, वाईट परंपरा, गैरसमजुती यांना धक्का नसतो. माणूस कोणतीही गोष्ट चटकन स्वीकारत नाही. त्यामुळे होणारे नुकसान टाळता येते.

या पार्श्वभूमीवर राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी आपल्या साहित्यातून वैज्ञानिक दृष्टिकोण स्वीकारला आहे. त्यांच्या 'ग्रामगीते'तून वैज्ञानिक दृष्टिकोणाचे काही दाखले आलेले आहेत ते खालीलप्रमाणे सांगता येतील —

१.''चहुबाजूंनी केणी घाण। त्यात जंतु झाले निर्माण।
त्यातूनि रोगांच्या साथी भिन्न भिन्न। वाढ घेती।।'' (ग्रा.अ. १४.८)
२.''कोणी करणी, कौटाळ म्हणती। कोणी पिशाच्चास भारती।
औषधेहि न देता रोगी मारति। मूर्खपणाने।।'' (ग्रा.अ. १४.१५)
३.''करविती नवस सायास थोर। देवपूजेचा जोर सोर।
रेडे, बकरे, कोंबडे पामर। कपितति अज्ञाने।।'' (ग्रा.अ. १४.१७)
४.''ऐशा ज्या ज्या वाईट रिती। झुगारोनि द्याव्या हातोहाती।
करावी पुन्हा नवीन निर्मिती। समाज नियमांची।।'' (ग्रा.अ. २१.४४)
५.''जेथे प्रेम आणि पावित्र्य। त्यासीच नाम तीर्थक्षेत्र।
कासया जावे गोंधळ विचित्र। बघाया तीर्थी।।'' (ग्रा.अ. २४.५८)
६.''एका ठिकाणी देव जागृत। बाकी ठिकाणी काय भूत।
कैसी झाली समजूत। उलटी आमची।।'' (ग्रा.अ. २५.३२)
७.''मंदिरे म्हणजे पाठशाळा। चाले शिक्षणाचा सोहळा।
झाला निधी सर्व गोळा। याच कार्यी लावावा।।'' (ग्रा.अ. २५.७०)

अशा सर्व वचनातून राष्ट्रसंतांचा वैज्ञानिक दृष्टिकोण स्पष्ट होते. तसेच आज समाजात निरक्षरता, अज्ञान, अंधश्रद्धा, जुन्या रूढी, परंपरा, सामाजिक कठोर व अघोरी बंधने अजूनही दिसतात. या सर्व गोष्टींमुळे देशाचा विकास खुंटतो. या गोष्टींचे आपल्या समाजातून निर्मूलन व्हावे. ही भावना राष्ट्रसंतांच्या साहित्यातून प्रकट होते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्यातून आलेला वैज्ञानिक दृष्टिकोण खालील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**वैज्ञानिक शिक्षणावर भर :—**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विज्ञानाचे महत्त्व जाणणारे संत होते. राष्ट्राच्या वैज्ञानिक प्रगतीला असाधारण महत्त्व आहे. त्यामुळे विज्ञानाचे



Scanned with CamScanner

ISBN-978-93-91305-33-8

शिक्षण विद्यार्थ्यांना दिले गेले पाहिजे. या मताचे राष्ट्रसंत होते. या संदर्भात महाराज म्हणतात —

''अहो! ही निसर्गाची रचना। समजली पाहिजे सर्वजणा।
खाद्याचे होते खत जाणा। खतापासोनि खाद्योत्पत्ती।।''[१]

शेतकऱ्यांनी विज्ञानाचे महत्त्व जाणून घ्यावे. तसेच विद्यार्थ्यांना धान्योत्पादन आणि खतनिर्मितीची आवश्यकता समजून घ्यावी. यासाठी विज्ञानाचे ज्ञान आवश्यक आहे असे महाराजांना वाटत होते. खत निर्मितीमधील क्रिया—प्रक्रिया विद्यार्थ्यांना समजावी हा त्यामागील उद्देश आहे. तसेच त्यावर संशोधन करून धान्योत्पादन वाढविण्यास विद्यार्थ्यांना महाराज आवाहन करतात. या काळाचा विचार केला तर भारतात अन्नधान्याची फारच कमतरता होती. अमेरिकेसारख्या देशावर आपण अवलंबून होतो. त्यामुळे महाराज उत्पादनावर जास्त भर देतात. भारतात शेती करण्याची पद्धती परंपरागत आहे. त्यामुळे शेती व्यवसाय अधोगतीकडे चाललेला दिसून येतो.

''नाही अवजारात सुधारणा। सुधारू न शके पिके नाना।।''

शेतीतील नवनवीन तंत्रज्ञानाचा शिक्षणामध्ये समावेश करण्यात यावा. याकडे राष्ट्रसंत आपले लक्ष आकर्षित करतात.

भारतात प्रादेशिक वैशिष्ट्यता असल्यामुळे विशिष्ट भागात विशिष्ट पिकांचे उत्पादन जास्त असलेले दिसते. या उत्पादित कच्च्या मालाचे पक्क्या मालात रूपांतर करण्याची प्रक्रिया त्याच ठिकाणी व्हावी. यासाठी वैज्ञानिक पिढी निर्माण करण्याची आवश्यकता राष्ट्रसंतांनी सांगितली आहे.

''कच्ची सामुग्री गावच्या भागी। ती पुरेपुर आणावी उपयोगी।
शोध करोनि नाना प्रयोगी। नाती करावी सोन्यासम।।
उद्योगे यंत्रही निर्मावि। परदेशा भीक न मागावी।
आपणाचि करोनि भोगावी। वैभवे सारी।।''[२]

अशा पद्धतीने यंत्रनिर्मिती सुद्धा आपणच करण्याचा सल्ला महाराज देतात. जागतिक स्तरावरील वैज्ञानिक प्रगती विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून देण्यासाठी महाराज म्हणतात —

''केले मंगळावरी उड्डाण। चढला हिमगीरी शिखरी पूर्ण।
शोधिले अग्निअस्त्र, अणुशास्त्रमहान। हायड्रोजनादि।।''[३]

अशी प्रगतीची शिखरे आपण गाठावीत यासाठी विज्ञानाचे शिक्षण आणि वैज्ञानिक दृष्टिकोण आवश्यक आहे असे महाराज म्हणतात.



Scanned with CamScanner

ISBN-978-93-91305-33-8

"ऐकती करोडो मैलांवरून। परस्परांचे गायन—भाषण।
विश्व हे आटोक्यात आणून। घर केले राहण्याचे।।"[४]

विज्ञानाच्या प्रगतीपुढे विश्व हे एकमेकांच्या जवळ आल्याचे दिसून येते. जगाला त्याच्या भाषेत उत्तर देण्यासाठी आपली तयारी आवश्यक आहे. म्हणून वैज्ञानिक शिक्षणाचे महत्त्व महाराज सांगतात. त्यांची ही वैज्ञानिक दृष्टी राष्ट्रीय विकासाची पायाभरणी करणारी आहे.

**संशोधन वृत्तीवर भर :—**

शैक्षणिक क्षेत्रामध्ये प्रात्यक्षिकांवर विशेष भर दिला जावा असे राष्ट्रसंत सुचवितात. यातून त्यांची वैज्ञानिक दृष्टी दिसून येते. ते म्हणतात —

"म्हणोनि अभ्यासाबरोबरी। सक्रिय करू द्यावी तयारी।
मुलगा सर्व कामे करी। जीवनाची आपुल्या।।"[५]

प्रात्याक्षिकातील ज्ञान जास्त काळ टिकणारे असते त्याच्या सरावाने विद्यार्थ्यांमध्ये नवनवीन अभ्यास करून संशोधन प्रवृत्तीस चालना मिळते. ज्या विषयामध्ये त्याली गोडी असेल त्या विषयाचा त्याला अभ्यास करू द्यावा असे महाराज सूचवितात.

"तो पुढे ज्यात निष्णात। त्या विद्येचा होऊ द्यावा अंत।
होऊ द्यावे अभ्यास संशोधनात। गर्क त्याला।।"[६]

अशाप्रकारे संशोधनातून वैज्ञानिक दृष्टी निर्माण होऊन ग्रामाचा विकास घडविण्यावर राष्ट्रसंतांचा भर होता.

**अवतारवादास विरोध :—**

राष्ट्रसंतांनी अवतारवाद पूर्णपणे फोल ठरविलेला असल्याचे दिसून येते. यातून त्यांची वैज्ञानिक दृष्टी आपल्या प्रत्ययास येते. अवतारवादाच्या संदर्भात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात —

"सारे नगरमें शोर है, अवतार पैदा हो गया।
मुझको बडी आयी हंसी, भगवान कैसे दो भया?।
जो अवतारे सबही तो ये भगवानके रूप है।
कोई बडे छोटे रहे, यह दिव्यता का माप है।"[७]

मनुष्य आपल्या कार्यानुसार आपले स्थान बनवतो. मोठे कार्य करणाऱ्याला अवतार मानावेत असे राष्ट्रसंत सांगतात.

**मूर्तिपूजेस विरोध :—**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा मूर्तिपूजेस विरोध होता. देव हा मंदिरात नसतो. तो भक्तांच्या शरीरात, मनात, हृदयात असतो.



Scanned with CamScanner

ISBN-978-93-91305-33-8

त्यामुळे हृदयातील भगवंत जाणण्याची शिकवण राष्ट्रसंत देतात. देवाच्या मूर्तींना तेलतुपाची आंघोळ घालणे, शेंदूर फासणे व अभिषेक घालणे यासारख्या गोष्टी व्यर्थ असल्याचे राष्ट्रसंत म्हणतात. मंदिर व पूजेच्या दर्शनाबाबत राष्ट्रसंत तुकडोजी म्हणतात —

"मनमन्दर है ज्ञान है पुजा। आतम दर्शन ही बलिहारी।।
तीरथकर कर मल—मल न्हाये। दिल नही धोये, तन कोतारी?
जहाँ देखो वहाँ पत्थर—पानी।।"[८]

तीर्थयात्रेत आणि मंदिरात देव नसतो, तर माणसाचे स्वच्छ मन हे मंदिर आहे, ज्ञान ही खरी पूजा आहे आणि आत्मदर्शन हेच खरे दर्शन आहे, म्हणून राष्ट्रसंतांनी मूर्तिपूजेस विरोध केला.

**रूढी / बाह्य अवडंबरास विरोध :—**

माणसे अंधानुकरणाने भक्तीमार्गाचा अवलंब करीत होते. कपाळी टिळा लावणे, गळ्यात मोठमोठ्या माळा घालणे, नियम, योग, याग विधी संस्कार अशा अनेक अनिष्ट रूढी / बाह्यअवडंबर संपूर्ण देशभर वाढतच आहे. हे सर्व पाहून राष्ट्रसंतांचे हृदय हेलावले. लोक बाह्यअवडंबराने शूचिर्भूत होऊन स्वतःला भक्त समजतात, तो त्यांचा अहंकार आहे. यासंदर्भात राष्ट्रसंत म्हणतात —

"हाथो मे माला, दिल है काला। जो आये उसको चुसा और डाला।।"[९]

अध्यात्म्याच्या अज्ञानामुळे मनुष्य काय करेल, ते सांगता येत नाही. तुकडोजी 'ग्रामगीते'त म्हणतात —

"देवाचिया मुर्तीसाठी। सोने हिरे बैसवी मुकुटी।
न दे श्रमीकासी लंगोठी। मंदिर बांधता मेला तरी।
कसले हे देवपूजन?। मूर्तिपूजेचे विडंबन।
केवढे शिरले आहे अज्ञान। आपणामाजी।।"[१०]

अशाप्रकारे कचाट्यात अडकलेल्या भक्तांना योग्य भक्तीमार्ग लाभावा, त्यासाठीच राष्ट्रसंतांनी भजन—कीर्तनाव्दारे समाजात जागृती करण्याचा प्रयत्न केला.

**शास्त्रग्रंथास विरोध :—**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या काळात पारंपरिक धर्मग्रंथांचे प्राबल्य अधिक होते. कालबाह्य आचारविचारांना माणसे आदर्श मानत होती. त्यामुळे आचारविचारांना मान्यता मिळत होती. राष्ट्रसंतांनी वेद, शास्त्रे, पुराणे इ.चे अतिशय मार्मिकपणे खंडन केलेले आहे. वेद



Scanned with CamScanner

ISBN-978-93-91305-33-8

पाठ करणारे सुद्धा देवाला ओळखू शकले नाहीत. या संदर्भात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात —

''कोई ज्ञान सिखे, वेदोंके पाठ करके।
वह भी कहे, हमारा किस्मत घुमा रहे है।।''[११]

जोपर्यंत या पोथी पुराणाचा अर्थ आपण समजून घेत नाही, तोपर्यंत त्याचा काही उपयोग नाही.

''दिनभर पूजापाती करते। पोथी पुराण कान मे भरते।
मन को डरते महान।''

सत्यज्ञान मृत्यूची भीती दूर करते. याप्रमाणे संत तुकडोजी महाराजांनी अनेक उदाहरणात शास्त्रग्रंथाची निष्प्रभता सांगितली आहे.

**अंधश्रद्धा निर्मूलनावर भर :—**

भारतीय संत परंपरेने सतत अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य केले. या काळात समाजात मोठ्या प्रमाणावर अंधश्रद्धा बोकाळलेली होती. अज्ञानातून अंधश्रद्धा निर्माण होते. या अज्ञानामुळे समाजात वाईट रूढी आणि परंपरा रूढ होऊ लागल्या. अज्ञानात रूतलेली जनता जादूटोणा, नवस, मंत्रतंत्र, पशूबळी, होमहवन इत्यादी तांत्रिक कल्पनांमध्ये विश्वास ठेवत होती. बुवाबाजीचे प्रमाण वाढले होते. त्यांचा अनेक लोकांना फटका सुद्धा बसत होता. सामान्य लोक पाखंडी बुवाबाजीमुळे फसविल्या जात होते. त्यामुळे समाजाचे अज्ञान दूर करण्यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी समाज प्रबोधनाचे कार्य सुरू केले.

समाजातील अंधश्रद्धा भोंदुबाबांच्या उदयासाठी कारणीभूत ठरली होती. समाजातील एक मोठा वर्ग त्यांच्या चमत्काराकडे आकर्षित झाला होता. त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन भोंदूगिरी करणाऱ्या लोकांनी लवकरात लवकर मनोकामना पूर्ण करून देण्याचा भ्रम समाजामध्ये पसरविला. त्यामुळे समाजाचे अध:पतन होऊ लागले. ही भोंदुगिरीची मानसिकता अंधश्रद्धेला खतपाणी घालणारी आहे असे महाराजांना वाटत होते. या संदर्भात राष्ट्रसंत म्हणतात —

''परंतु ऐसी सांडोनि रिती। उगीच बुवांच्या पाया पडती।
त्यानेच सर्व होते समजती। अंतरी लोकं आपुल्या।।
पाया पडल्याने सर्व होते। मग काम कासया करावे ते?।
पोटासि मिळेल आई ते। मोक्ष लाभेल बुवापायी।।''[१२]

महाराजांचे वरील विचार बुवाबाजीच्या पूर्णपणे विरोधी होते. त्यांनी हा विचार आपल्या भजन आणि भाषणांच्या माध्यमातून



Scanned with CamScanner

ISBN-978-93-91305-33-8

जनतेपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला. समाजाचे अज्ञान शिगेला पोहोचले होते. त्यांना संतांचे खरे कार्य अजूनही समजलेले नव्हते. संत म्हणजे चमत्कार करणारा पुरूष अशी धारणा सामान्य जनतेची होती. त्यामुळे संत दर्शनाने रोग निवारण व्हावे, संतान प्राप्ती व्हावी, धन प्राप्त व्हावे, नोकरी लागावी, सोयरिक जुळावी, राजकीय पद भेटावे, वेड लागलेल्या व्यक्तीला दुरूस्त करावे इ. अपेक्षा अज्ञानापोटी संतांकडून जनता करीत होती.

> ''ऐसे जनांचे म्हणणे चाले। परिसांगा ऐसे कोठे झाले?।
> कोणत्या संताने केले। सुखी समृद्ध सर्वांलागी?।।
> याचा विचार न करिती। चमत्कारासाठी मरमरती।
> काय संतापाशी आहे भेदवृत्ती। इतरा शांती न द्याया?।।
> साधूसंताचि मेल देती। तरी वांझ जगी राहती?।
> संत धन वैभव अर्पिती। तरी भिकारी न दिसावे।।''[१३]

असा विज्ञानवादी दृष्टिकोण तुकडोजी महाराजांनी समाजात रूजविण्याचा प्रयत्न केला.

अशाप्रकारे राष्ट्रसंतांच्या समाजप्रबोधनातून वरील सर्व मुद्यांच्या आधारे आपणांस राष्ट्रसंतांच्या वैज्ञानिक दृष्टीचे आकलन करण्यात आले आहे.

राष्ट्रसंतांच्या समाजप्रबोधनातील वैज्ञानिक दृष्टिकोण हा कृतिशीलतेवर आधारित असल्याचे आपणांस दिसते. समाजातील निरक्षरता, अज्ञान, अंधश्रद्धा, जुनाट व अनिष्ट रूढी—परंपरा, अघोरी बंधने या गोष्टींमुळे देशाचा विकास खुंटतो असे राष्ट्रसंत सांगतात. त्या अनुषंगाने राष्ट्रसंतांनी आपल्या साहित्यातून आणि समाजप्रबोधनातून वैज्ञानिक दृष्टिकोणाचा अंगिकार केल्याचे आपल्या दृष्टीस येते. हा वैज्ञानिक दृष्टिकोण वैज्ञानिक शिक्षणावर भर, संशोधन वृत्ती, अवतारवादास विरोध, मूर्तीपूजेस विरोध, बाह्य अवडंबरास विरोध, अंधश्रद्धा निर्मूलन या घटकांच्या व्दारा स्पष्ट करण्यात आला आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :—**

१) राजगुरू माधव (संपा.), 'ग्रामगीता' अध्याय १२, ओ. ६१, पृ. क्र. ३३२.

२) तत्रैव, अ. १२ ओवी ४१, पृ.क्र. २०५.

३) तत्रैव, अ. १८ ओवी ५५, पृ.क्र. १९६.

४) तत्रैव, अ. ३५ ओवी ११२, पृ.क्र. ३७८.



Scanned with CamScanner

ISBN-978-93-91305-33-8

५) तत्रैव, अ. १९ ओवी ६४, पृ.क्र. १९६.
६) तत्रैव, अ. १९ ओवी ६५, पृ.क्र. १९७.
७) राष्ट्रसंत तुकडोजी – मेरी जीवन यात्रा, श्री गुरूदेव प्रकाशन, गुरूकुंज आश्रम, जि. अमरावती, पृ. ३४.
८) राष्ट्रसंत तुकडोजी – विवके सरिता, श्री गुरूदेव प्रकाशन, गुरूकुंज आश्रम, जि. अमरावती, पृ. ४१.
९) राष्ट्रसंत तुकडोजी – भक्तीसुधा, भजनावली, श्री गुरूदेव प्रकाशन, गुरूकुंज आश्रम, जि. अमरावती, पृ. १५.
१०)राष्ट्रसंत तुकडोजी – ग्रामगीता अध्याय २६, ग्रामगीता प्रकाशन समिती, नागपूर, पृ. २३८ – २३९.
११)राष्ट्रसंत तुकडोजी – सामुदायिक प्रार्थनी, श्री गुरूदेव प्रकाशन, गुरूकुंज आश्रम, जि. अमरावती, पृ. २५.
१२)राजगुरू माधव (संपा.), ग्रामगीता, उनि, अध्याय २१, ओवी ३९, ४०, पृ. क्र. २२७.
१३)तत्रैव, अध्याय २१, ओवी ८३, ८४, ८५, पृ. २३०.



Scanned with CamScanner